# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२

ईमेल – mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

**लातूर जिल्हा कृषि हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक – ०२.०७.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक: २८/०६/२०१९ ते ०२/०७/२०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०३/०७/२०१९ | ०४/०७/२०१९ | ०५/०७/२०१९ | ०६/०७/२०१९ | ०७/०७/२०१९ |
| पाऊस (मिमी) | ०७.० | ०३.० | ०२.० | ००.० | ०१.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २८.० | २६.० | २७.० | २७.० | २८.० |
| किमान तापमान (अं.से.) | २०.० | २०.० | २०.० | २०.० | २०.० |
| ढग स्थिती | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८२ | ८३ | ८० | ७९ | ७८ |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ६८ | ७३ | ५७ | ५७ | ५१ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २५ | २७ | २३ | २२ | २४ |
| वाऱ्याची दिशा | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम | पश्चिम |

पुढील पाच दिवसात लातुर हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पेरणीयोग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाल्यास जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करूनच बिजप्रक्रीया करून पिकांची पेरणी करावी. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यास शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये. मराठवाडयात ज्या भागात पेरणीयोग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाला असेल (लातुर जिल्हा : जळकोट, निलंगा, रेणापूर, उदगीर) तेथे खरीप पिकांची बिजप्रक्रीया करून पेरणी करावी.

| पिकाचे नाव | अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| कापूस | लागवड | कापूस पिकाची लागवड १५ जुलैपर्यंत करता येते. वाण: पीए-२५५, पीए-५२८, एन एच-६१५, एनएचएच-२५०, एनएचएच- ४४. |
| तुर | लागवड / पेरणी | तुर पिकाची लागवड / पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. वाण: बीडीएन-७१६, ७११. |
| मुग / उडीद | पेरणी | मुग / उडदी पेरणी ०७ जुलैपर्यंत करता येते. वाण: बीएम २००३-२. |
| भुईमूग | पेरणी | भुईमूग पिकाची पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. |
| सोयाबीन | पेरणी | सोयाबीन पकाची पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. वाण: एमएयुएस-६१२, ७१, १५८, १६२ तसेच एएमएस-१००१, जेएस-९५६०, डीएस-२२८, जेएस-२०२९, जेएस- ९३०५. |
| मका | पेरणी | मका पिकाची पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. |
| केळी | लागवड | पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन केळी फळबागेची लागवड करू नये. बागेत आंतरमशागतीची कामे केली नसल्यास पूर्ण करून घ्यावी. |
| आंबा | लागवड | पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन आंबा फळबागेची लागवड करू नये. बागेत आंतरमशागतीची कामे केली नसल्यास पूर्ण करून घ्यावी. |
| द्राक्ष | वाढीची अवस्था | द्राक्ष बागेत तणाचे नियंत्रण करावे. |
| सिताफळ | लागवड | पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन सिताफळ फळबागेची लागवड करू नये. बागेत आंतरमशागतीची केली नसल्यास कामे पूर्ण करून घ्यावी. |
| भाजीपाला | तण नियंत्रण | गादी वाफयावर रोपे तयार करण्यासाठी बी टाकलेले असल्यास गादी वाफयावरील तणांचे नियंत्रण करावे. |
| फुलशेती | छाटणी | गुलाबाची छाटणी केली नसल्यास छाटणी करून १ टक्के बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. |
| तुती रेशीम उदयोग | -- | रेशीम किटक संगोपन सुरू करण्याच्या चार दिवस अगोदर तुती बागेस पाण्याची पाळी दयावी. रेशीम किटकास दिलेल्या पाने खादयामध्ये ८० टक्के आर्द्रता असणे आवश्यक आहे. १० टक्के पेक्षा जास्त तुती पाने सुकली तर रेशीम किटकांना खाता येत नाही. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पाऊस पडल्यानंतर मराठवाडा सारख्या कोरडया हवामानाच्या भुभागावर आर्द्रता निर्माण होऊन अनेक परजिवींची वाढ गतीने होते व अशा परजिवींची लागण पाऊस पडल्यानंतर तात्काळ होते, म्हणून पशुधनामध्ये (गाय, म्हैस, शेळी, मेंढी) परजिवींची लागण टाळण्यासाठी प्रौढ शेळी व मेंढीमध्ये पाऊस पडल्यानंतर तात्काळ पडकावर चारावयास नेण्यापूर्वी एक जंतनाशक औषधाची मात्रा दयावी. |

सदर कृषि हवामान सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करण्यात आली असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.